
SEED

Suresh Dada Scheme for
Educational & Entrepreneurial Development
सुरेशदादा शैक्षणिक व उदयोजकता विकास योजना

www.sdseed.in

19 YEARS
EMPOWERING STUDENTS SINCE 2008
Suresh Dada Scheme for
Educational & Entrepreneurial Development
सुरेशदादा शैक्षणिक व उदयोजकता विकास योजना

# आमचे प्रेरणास्थान



## आदरणीय श्री सुरेशदादा जैन

- ## ध्येय

**'गुणवंत विद्यार्थ्यांमध्ये शैक्षणिक व उद्योगजकता कौशल्ये विकसित करून त्यांना जागतिक स्तरावर सक्षम बनविणे.'**

## उद्दिष्टे

- **शैक्षणिक जागरूकता:** सर्व समाजामध्ये शिक्षणाचे महत्त्व वाढविणे
- **आर्थिक मदत:** पात्र विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती आणि आर्थिक सहाय्य प्रदान करून त्यांना त्यांची शैक्षणिक उद्दिष्टे साध्य करण्यास मदत करणे.
- **रोजगार क्षमता वाढवणे:** विद्यार्थ्यांना यशस्वी करिअरसाठी आवश्यक कौशल्ये आणि अनुभव देण्यासाठी व्यापक विकास कार्यक्रमांची आखणी करणे.
- **शाश्वतता:** आमच्या कार्यक्रमांचा फायदा विदयार्थ्यांना दीर्घकाळ होत राहील हे सुनिश्चित करणे. जेणे करून वाढत्या संख्येने विद्यार्थ्यांना फायदा होईल.
- **व्यापक उपक्रम**: विद्यार्थी, शिक्षक आणि पालकांना सक्षम करणारे कार्यक्रम विकसित करणे आणि त्याची अंमलबजावणी करणे.

- ## कार्यक्षेत्र

**जळगाव जिल्ह्यातील सर्व जाती, धर्म पंथातील इयत्ता ८ वी त्यापुढील विद्यार्थ्यांना एसडी-सीड योजने अंतर्गत लाभ घेता येईल.**

# पार्श्वभूमी

• **सुरेशदादा शैक्षणिक आणि उद्योजकता विकास योजना (एसडी-सीड) २००८ मध्ये** जळगाव जिल्ह्यातील तरुणांमध्ये शिक्षण आणि उद्योजकतेला प्रोत्साहन देण्यासाठी सुरु करण्यात आली.

• आमचे प्रेरणास्थान आदरणीय सुरेशदादा जैन यांना विश्वास आहे की, **'शिक्षण हे समाजाच्या प्रगतीचे आणि वैयक्तिक सशक्तीकरणाचे मुख्य आधारस्तंभ आहेत'.**

• एसडी-सीडला मार्गदर्शन करण्यासाठी अध्यक्षा श्रीमती रत्ना सुरेशदादा जैन, कार्यकारी अध्यक्षा मीनाक्षी जैन आणि गव्हर्निंग बोर्डचे अध्यक्ष डॉ. प्रसन्नकुमार रेदासनी यांच्यासह ३० समर्पित लीडर आणि सल्लागार समिती आहे. १४ तालुका समन्वयक तालुका प्रतिनिधित्व करतात.

• आमचा प्रमुख उपक्रम, **'मातोश्री प्रेमाबाई जैन उच्चशिक्षण शिष्यवृत्ती',** ज्याद्वारे आर्थिक आव्हानांचा सामना करणाऱ्या शैक्षणिकदृष्ट्या होतकरू विद्यार्थ्यांना वार्षिक स्वरूपात शिष्यवृत्ती दिली जाते.

• शिष्यवृत्ती निवड समिती प्रत्येक अर्जाचे काटेकोरपणे मूल्यांकन करते, जेणे करून योग्य विद्यार्थ्यांना मदत मिळेल.

• शिष्यवृत्तीसोबतच विद्यार्थ्यांचा शैक्षणिक प्रवास आणि भविष्यातील रोजगारक्षमता वाढवण्यासाठी प्रशिक्षण, इंटर्नशिप, मेंटॉरशिप, करिअर मार्गदर्शन यासारखे विविध विद्यार्थी-केंद्रित कार्यक्रम राबविले जातात.

• एसडी-सीड विद्यार्थ्यांच्या विकासासाठी शिक्षक प्रशिक्षण आणि पालक समुपदेशन करून शिक्षक आणि पालकांना सक्षम बनवते

# एसडी सीड सामाजिक प्रभाव



# महाराष्ट्राच्या नकाशावरील जळगाव



# महाराष्ट्राच्या तुलनेत जळगांव जिह्यातील साक्षरतेचे प्रमाण

| राज्य / जिल्हा | ग्रामीण साक्षरता प्रमाण (%) | | शहरी साक्षरता प्रमाण (%) | | एकूण साक्षरता प्रमाण (%) | |
|---|---|---|---|---|---|---|
| | जनगणनेनुसार | | जनगणनेनुसार | | जनगणनेनुसार | |
| | 2001 | 2011 | 2001 | 2011 | 2001 | 2011 |
| महाराष्ट्र | 70.36 | 77.09 | 85.48 | 89.84 | 76.88 | 82.91 |
| जळगाव | 72.10 | 76.04 | 83.62 | 87.51 | 75.43 | 79.73 |

*स्त्रोत:* **www.census2011.co.in**

*राज्यस्तरीय साक्षरता जुळण्यासाठी जळगावमधील साक्षरतेचे प्रमाण सुधारण्यासाठी वाव आहे.*

# संस्थेची संरचना

**सौ.रत्ना सुरेश दादा जैन**
**अध्यक्षा**

**मीनाक्षी सुरेश दादा जैन**
कार्याध्यक्षा

**डॉ.प्रसन्नकुमार रेदासनी**
अध्यक्ष

**एसडी-सीड असोसिएट**

## गव्हर्निंग बोर्ड

- श्री. निळकंठ गायकवाड
- प्रा. नंदलाल गादिया
- श्री. महेश गोरडे
- श्री. सागर पगारिया
- डॉ. एस.एस.राणे
- डॉ. रानिदास डाकलिया
- श्री.राजेश यावलकर
- श्री. उमेश सेठिया

## मार्गदर्शन समिती

- श्री मनोज गोविंदवार
- प्रा. एस.व्ही. सोमवंशी
- श्री. अनिल राव
- डॉ.अजित वाघ
- डॉ.एस.पी.बडगुजर
- डॉ. विजय माहेश्वरी
- डॉ.सुरेश अलीझाड
- डॉ.डी.टी. नेहते
- प्रा. संजय दहाड
- डॉ. विवेक काटदरे
- डॉ.गौरी राणे
- डॉ. नरेंद्र जैन
- सौ.पुष्पा भंडारी
- श्री किरण अग्रवाल
- सौ अप्रूप राका
- श्री. शिरीष बर्वे
- प्रा. सुरेश पांडे
- श्री सुभाष लोढा
- श्री. अजित कुचेरिया
- श्री. विक्रांत सराफ

## तालुका समन्वयक

- श्री. जयंतिलाल सूरणा , **भुसावळ**
- श्री. पप्पुशेठ बडोला,**पाचोरा**
- श्री. सुरेश अलीझाड , **चोपडा**
- श्री. विनोद कोटेचा, **बोदवड**
- श्री. नंदन वाळिंकर, **यावल**
- श्री. श्री. हेमंत कुमार पाटील, **पारोळा**
- श्री. योगेश मुंदडा, **अमळनेर**
- श्री. चित्रसेन पाटील , **चाळीसगाव**
- श्री. सुरेश भंडारी, **भडगाव**
- श्री. नितीन बिर्ला , **एरंडोल**
- श्री. शैलेश जाजू ,**धरणगाव**
- श्री. सुरेशचंद्र धारीवाल , **जामनेर**
- डॉ यशपाल जैन , **मुक्ताईनगर**
- श्री. बबनलाल अग्रवाल, **रावेर**

# आमचा प्रमुख कार्यक्रम
## मातोश्री प्रेमाबाई जैन उच्च शिक्षण शिष्यवृत्ती

### नवीन अर्जदारांसाठी निवडीचे निकष:

- विद्यार्थी जळगाव जिल्ह्यातील रहिवासी असावी.
- विद्यार्थ्याने दहावी व त्यापुढील परीक्षा पहिल्या प्रयत्नात उत्तीर्ण होणे आवश्यक आहे.
- कौटुंबिक वार्षिक उत्पन्नाची मर्यादा रु. २,००,०००/–
- दिव्यांग / एकल पालक / निराधार विद्यार्थ्यांना विशेष प्राधान्य दिले जाईल.
- शिष्यवृत्ती मिळण्यासाठी गुणांची पात्रता खालीलप्रमाणे असणे आवश्यक:

| अ.क्र. | रहिवास | इयत्ता १० वी अपेक्षित गुण | इयत्ता १२ वी अपेक्षित गुण |
|---|---|---|---|
| १ | ग्रामीण भागातील विद्यार्थी | ८५ % | ७५ % |
| २ | शहरी भागातील विद्यार्थी | ९० % | ८० % |
| ३ | दिव्यांग / एकल पालक / निराधार विद्यार्थी | ७० % | ७० % |
| ४ | एम.एच-सीईटी | NA | १२० गुण |

# आमचा प्रमुख कार्यक्रम
## मातोश्री प्रेमाबाई जैन उच्च शिक्षण शिष्यवृत्ती

**नुतनीकरण अर्जदारांसाठी निवडीचे निकष :**

- विद्यार्थी (ड्रॉप-आउट विद्यार्थ्यांसह) एसडी-सीड शिष्यवृत्ती लाभार्थी असावा.
- विद्यार्थी मागील शैक्षणिक वर्षातील परीक्षा उत्तीर्ण असावा.
- विद्यार्थ्यास फक्त एका विषयात ATKT मिळालेला असावा.
- कौटुंबिक वार्षिक उत्पन्नाची मर्यादा रु. २,००,०००
- दिव्यांग / एकल पालक / निराधार विद्यार्थ्यांना विशेष प्राधान्य दिले जाईल.

**पात्रता टक्केवारी**

| अ.क्र | विद्यार्थी | किमान पास टक्केवारी |
|---|---|---|
| १ | १२वी ते डिग्री (पहिल्यांदा) | ७५% |
| २ | डिप्लोमा (तिसरा वर्ष) ते पदवी | ७५% |
| ३ | प्रवेश पदवीसाठी पदव्युत्तर | ७५% |

# दत्तक शिष्यवृत्ती कार्यक्रम

- आमचे ध्येय म्हणजे महत्त्वाकांक्षा आणि संधी यांच्यामधील दरी कमी करणे. यासाठी आम्ही अधिकाधिक आर्थिकदृष्ट्या दुर्बल विद्यार्थ्यांना आर्थिक मदत पुरवतो, ज्यामुळे ते शिक्षणावर लक्ष केंद्रित करून आपली संपूर्ण क्षमता गाठू शकतील.
- पात्र विद्यार्थ्यांना आर्थिक शिष्यवृत्ती प्रदान करण्यासाठी असंख्य व्यक्ती आणि संस्थांनी एसडी-सीड सोबत सहकार्य करण्याची मनापासून इच्छा व्यक्त केली आहे.
- आमची व्याप्ती वाढविण्यासाठी व यातून लाभार्थी विद्यार्थ्यांची संख्या वाढविण्यासाठी आम्ही दत्तक शिष्यवृत्ती कार्यक्रम (एएसपी) स्थापन केला आहे.
- आम्ही तुम्हाला या उदात्त व पवित्र कार्यात सामील होण्यासाठी आमंत्रित करतो आणि तीन ते पाच वर्षे सतत पाठिंबा देण्यासाठी आवाहन करीत आहोत.

# लाभार्थी परतफेड योजना

- हा कार्यक्रम जबाबदारीची भावनावाढवून कृतज्ञता, व्यापक समुदाय आणि शाश्वतता या तत्वावर आधारित आहे.

- कार्यक्रमाचा उद्देश असा आहे की, शिष्यवृत्तीचे फायदे वैयक्तिक प्राप्तकर्त्यांच्या पलीकडे व्यापक समुदायापर्यंत विस्तारावेत.

- माजी लाभार्थी इतर विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती, मार्गदर्शन आणि ज्ञानाची देवाणघेवाण करून विद्यार्थ्यांना मदत करतात.

# विद्यार्थी हिताचे कार्यक्रम

- एसडी–सीड विद्यार्थ्यांच्या हितासाठी शिष्यवृत्ती प्रशिक्षण आणि इतर कार्यक्रमांसह अशा पोषक वातावरणाची निर्मिती करीत आहे ज्यामुळे विद्यार्थ्यांना त्यांचे शैक्षणिक ध्येय सहजरित्या साध्य होण्यास मदत होईल

- हे करण्यासाठी एसडी–सीड सर्व हितधारकांच्या समग्र सक्रिय समुदायाची बांधणी करीत आहे.

# विद्यार्थी हिताचे कार्यक्रम (Contd.)

1. आर्थिक सहाय्य योजना
   - मातोश्री प्रेमाबाई जैन शिष्यवृत्ती
   - दत्तक शिष्यवृत्ती **योजना**
   - लाभार्थी परतफेड उपक्रम

२. लाभार्थी हिताचे कार्यक्रम
   - गणवेश व पुस्तकांचे वाटप
   - शैक्षणिक कर्ज बॅंक, सरकारी आणि इतर योजनांद्वारे
   - हॉस्टेलच्या माहिती
   - विविध ग्रंथालयांची माहिती
   - पुस्तक डेपो, कोचिंग क्लासेस, युनिफॉर्म आणि इतर शैक्षणिक पुरवठादार यांच्यासोबत करार ;
   - ज्ञान–यज्ञ (ई–न्यूजलेटर)

३. तज्ज्ञ समुपदेशकांकडून करिअर मार्गदर्शन **दिशा शिक्षणाच्या . वाटा भविष्याच्या**
   - करिअर जागरूकता
   - बुद्ध्यांक समतुल्य आणि अभियोग्यता चाचणी
   - वैयक्तिक समुपदेशन

# विद्यार्थी हिताचे कार्यक्रम (Contd.)

४ प्रशिक्षण कार्यक्रम **स्टोरे**

- विद्यार्थी मूल्यांकन कार्यक्रम
- स्पर्धात्मक आणि सार्वजनिक परीक्षांसाठी प्रशिक्षण
- परीक्षा प्रवेश प्रक्रिया माहिती
- प्रतिष्ठित व्यक्तींकडून प्रेरणादायी भाषण
- कौशल्य विकास प्रशिक्षण
- अर्तिफ़िचिअल इन्तेल्लिगेञ्चे
- मूल्य शिक्षण
- विज्ञान अनुभव
- शिक्षकांना प्रशिक्षण
- पालकांचे समुपदेशन

५ उद्योजकता विकास मार्गदर्शन

६ मेन्टरशिप प्रोग्राम

७ समर इंटर्नशीप

८ 'स्मार्ट गर्ल' प्रशिक्षण कार्यक्रम

९ एसडी–सीड अभ्यासिका

१० . माजी लाभार्थी मेळावा **(Pride Alumni Meet)**

# विविध सहायतांची उपलब्धी

एसडी–सीडने लाभार्थ्यांना आकर्षक सवलत मिळावी म्हणून विविध संस्थांसोबत करार केले आहेत, ज्यामुळे जिल्ह्यात सर्वांगीण विकास घडून येत आहे.

| सवलतीचा प्रकार | करार केलेल्या संस्थांची संख्या |
|---|---|
| १ बँक (शैक्षणिक कर्ज सहायतेसाठी) | ४५ |
| २ वसतीगृहे | ३ |
| ३ ग्रंथालये | ३ |
| ४ कोचिंग क्लासेस | ४१ |
| ५ पुस्तक दुकाने | २६ |
| ६ नोकरी सहायता | १ |
| ७ इंटर्नशीप | ९ |
| एकूण | १२८ |

# प्रशिक्षण कार्यक्रमांचे आयोजन (३१ जुलै २०२६ पर्यंत)

## (प्रशिक्षण कालावधी – जानेवारी ते डिसेंबर)

### टेबल 1

| क्र. | प्रशिक्षण विषय | आयोजित कार्यक्रमांची संख्या |
|---|---|---|
| १ | कौशल्य विकास | १४१ |
| २ | अभ्यासाचे महत्त्व | २४ |
| ३ | मुलाखत कौशल्ये | ४५ |
| ४ | करिअर मार्गदर्शन, प्रेरणादायी व्याख्यान आणि वैयक्तिक समुपदेशन | ५० |
| ५ | स्मार्ट गर्ल आणि युवती सशक्तिकरण | ४३ |
| ६ | वेळेचे व्यवस्थापन | ३० |
| ७ | ध्येय निश्चिती आणि संपादन | २७ |
| ८ | परीक्षेला कसे सामोरे जावे? | २२ |
| ९ | सीईटी परीक्षेचे मार्गदर्शन | ११ |
| १० | पालक समुपदेशन आणि शिक्षक प्रशिक्षण | ९ |
| ११ | योगाचे महत्त्व | ३ |
| १२ | मूल्यशिक्षण आणि विज्ञानाचे प्रशिक्षण | १५ |
| १३ | उद्योजक विकास | ४ |
| १४ | विद्यार्थी मूल्यांकन कार्यक्रम | १ |
| १५ | इन्वेस्टर्स बूट कॅम्प | १ |
| १६ | आर्थिक नियोजन | ३ |
| १७ | अर्तिफ़िचिअल इन्तेल्लिगेन्चे | ४ |
| | एकूण | ४३३ |


### टेबल 2

| क्र. | विद्यार्थी ,पालक आणि शिक्षकांचा शैक्षणिक स्तर | सहभागी विद्यार्थ्यांची संख्या |
|---|---|---|
| १ | पोस्ट-ग्रॅज्युएशन | ३८७४ |
| २ | ग्रॅज्युएशन | १४८५७ |
| ३ | इयत्ता ११वी व १२वी | ११९९० |
| ४ | इयत्ता ८वी ते १० वी | १७९०६ |
| ५ | पालक व शिक्षक | ३३० |
| ६ | पालक, शिक्षक आणि विद्यार्थी (वेबिनार) | ९६३ |
| | | |
| | एकूण | ४९९२० |

** कौशल्य विकास प्रशिक्षणामध्ये पुढील विषयांचा समावेश केला जातो. जसे – व्यक्तिमत्व विकास, प्रभावी संवाद, इंग्रजी बोलणे, श्रवण कौशल्य, स्मृती आणि एकाग्रता विकास, इत्यादी.*

*(संबंधित क्षेत्रातील तज्ज्ञांद्वारे प्रशिक्षण देण्यात येते)*

# २००८ ते २०२५ शाखा आधारित दिलेली शिष्यवृत्ती





*सर्वाधिक लाभार्थी इंजिनिअरींग शाखेतील आहेत*

२००८ ⟷ २०२५

**Total No. of Beneficiaries: १५६१९**

# शिक्षण पूर्ण केलेल्या लाभार्थ्यांची शाखा **आधारित** टककेवारी

## २००८ . २०२६




2009 —— 2026

*सर्वाधिक शिक्षण पूर्ण झालेले लाभार्थी इंजिनीअरींग शाखेतील आहेत.*

**Total no. of Pass Out beneficiaries : 3936**

# सर्वोत्तम कार्य

- शिष्यवृत्ती अर्जांची काटेकोर छाननी
- मार्गदन व मेंटॉरशिपच्या मदतीने विद्यार्थ्यांचा शिक्षण सोडण्याचा दर कमी करणे
- प्रशिक्षणापूर्वी व प्रशिक्षणानंतरचे मूल्यमापन
- अतिरिक्त सवलतींसाठी कोचिंग क्लासेस व पुस्तक विक्रेत्यांशी करार (MoU)
- व्यावहारिक अनुभव व ऑन-द-जॉब ट्रेनिंगसाठी संस्थांमध्ये इंटर्नशिप
- दात्यांसाठी दत्तक विद्यार्थ्यांचे प्रगती अहवाल

# आव्हाने

- मोबाईल क्रमांक आणि ठिकाण वारंवार बदलल्यामुळे विद्यार्थ्यांशी संपर्क तुटणे
- इंग्रजी, संगणक व रोजगारक्षम कौशल्यां मध्ये असलेली दरी
- आर्थिक तणावामुळे शिक्षणावर होणारा परिणामकरिअर
- मार्गदर्शनासाठी पालकांचा मर्यादित अनुभवविद्यार्थ्यांच्या
- आर्थिक गरजा आणि जबाबदाऱ्यांमुळे इंटर्नशिपवर होणारा परिणाम

# पुढील प्रक्रिया

- पालक-शिक्षक-विद्यार्थी यांच्यातील परस्पर संवादासाठी उत्तम इको-सिस्टम तयार करणे
- AI शिक्षणावर लक्ष केंद्रित करून प्रशिक्षण दिले जाणार
- पालकांना सक्रिय भूमिका बजावण्यासाठी प्रोत्साहित करणे
- विद्यार्थ्यांना समुपदेशन करून उच्च शिक्षणाचे महत्त्व वाढविणे
- व्यावसायिक प्रशिक्षण संस्थांशी संबंध ठेवणे
- परदेशात शिक्षण घेऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांना व्यासपीठ उपलब्ध करून देण्यासाठी शैक्षणिक मेळावे घेणे
- प्लेसमेंट सेल विकसित करून नोकरीच्या संधी उपलब्ध करून देणे.

# प्रमुख कार्यक्रम - २०२४ - २०२५







श्री सचिन आणि सौ सुप्रिया पिळगावकर, ज्येष्ठ अभिनेते







**डॉ. एस. एस. मंथा** कुलगुरू - रामदेव बाबा युनिव्हर्सिटी, नागपूर

**श्री दीपक चौधरी** अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक - स्पेक्ट्रम इलेक्ट्रिकल इंडस्ट्रीज

# प्रमुख कार्यक्रम - २०२२ ते २०२३







डॉ. श्री. आनंद कुमार संचालक – सुपर 30, पटना







डॉ. सौ. सुषमा पी विरमणी – संचालक – रामानुजन इंस्टिटयुट, चेन्नई

# प्रमुख कार्यक्रम २०१७ ते २०२१




श्री. अविनाश धर्माधिकारी, माजी सनदी अधिकारी व संस्थापक – चाणक्य मंडळ परिवार पुणे




श्री. हणमंतराव गायकवाड, संस्थापक – भारत विकास ग्रुप, मुंबइ
श्री. विजय दर्डा, अध्यक्ष – लोकमत मिडीया प्रा. लि., नागपूर




कोविड दरम्यान शिष्यवृत्ती वितरण शाशकीय मंडळ आणि सल्लागार समिती सदस्यांसोबत




श्री. विश्वासराव पाटील – ज्येष्ठ गांधीवादी विचारवंत, शहादा



19 YEARS
EMPOWERING STUDENTS SINCE 2008
Suresh Dada Scheme for Educational & Entrepreneurial Development
सुरेशदादा शैक्षणिक व उद्योजकता विकास योजना

# प्रमुख कार्यक्रम – २०१३ ते २०१६




डॉ. शंकर पुणतांबेकर, ज्येष्ठ साहित्यिक




डॉ. आनंद कर्वे, नामांकित वैज्ञानिक
डॉ. सुनिलकुमार लवटे, संशोधक व लेखक




डॉ. पंडीत विद्यासागर, कुलगुरू, मराठवाडा विद्यापीठ
डॉ. गिरीश कुलकर्णी, संस्थापक व अध्यक्ष, स्नेहालय, अहमदनगर




डॉ. राजन वेळूकर, माजी कुलगुरू, मुंबई विद्यापीठ
प्रा. पी.पी. पाटील, कुलगुरू, उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ
प्रा. प्रकाश पाठक, कार्यकारी संचालक, भोसल
नाशिक



19 YEARS
EMPOWERING STUDENTS SINCE 2008
Suresh Dada Scheme for Educational & Entrepreneurial Development
सुरेशदादा शैक्षणिक व उद्योजकता विकास योजना

# प्रमुख कार्यक्रम – २००८ ते २०११




श्री. एम.बी. शाह, ज्येष्ठ साहित्यीक व गांधीवादी विचारवंत




डॉ. एन.के. ठाकरे, माजी कुलगुरू–उमवि




डॉ. नरेंद्र जाधव,
सदस्य–नियोजन आयोग, भारत सरकार




डॉ. रघुनाथ माशेलकर, प्रसिद्ध वैज्ञानिक

# आमच्या विद्यार्थ्यांना प्रेरणा देणारे प्रसिद्ध नेते





Shri Hanmantrao Gaikwad
Founder
BVG India Ltd.



Shri Vijay Darda
Chairman,
Lokmat Media
Pvt. Ltd.



Dr. Shri Anand Kumar
Founder
Super 30



Shri N K Thakre,
Former Vice Chancellor,
N. M. University



Shri Shantilal Mutha
Founder
Bharitya Jain Sanghatana



Dr. Rajan Welukar Former Vice Chancellor
Mumbai University



Shri. Prakash Pathak,
Director,
Bhonsla Military School

Dr Pandit Vidyasagar
Vice Chancellor
Marathawada University





Dr. Raghunath Mashelkar
Eminent Scientist



Shri Narendra Jadhav
Member Planning Commn.
Govt of India



Shri Sachin &
Smt Supriya Pilgaonkar
Veteran Actors



Dr. Mrs Sushma P Veermani,
Director
Ramanujan Institute



Dr. Sunil Kumar Lawate
Reseacher &
Writer



Shri Deepak Chaudhary CMD
Spectrum Electrical Industries



Dr Shankar Puntambekar
Litterateur

Prof. P. P. Patil
Vice Chancellor
North Maharashtra University





Shri Deepchand Ghardi,
Social Worker,
Philanthropic businessman



Shri M B Shah
Renowned Writer



Shri Vishwas Rao Patil
Scholar on Gandhian Philosophy



Shri Avinash Dharmadhikari
Founder
Chanakya Mandal Pariwar



Shri. Bharat Amalkar,
Chairman
Keshav Smriti Sanstha



Dr Anand Karve
Renowned Scientist



Dr. S. S. Mantha
Chancellor
Ramdev Baba University

Dr Girish Kulkarni
Founder &
Director
Snehlaya

## प्रमुख पाहुणे २०२५



**श्री सचिन आणि श्रीमती सुप्रिया पिळगावकर ज्येष्ठ अभिनेते**

- आई-वडिलांचे संस्कार – जीवनाला दिशादर्शक बळ.
- अचूक निर्णय – योग्य वेळी घेतलेले निर्णय यशाची वाट मोकळी करतात.
- कौशल्य विकास – सतत शिकणे आणि स्वतःला अपग्रेड करणे आवश्यक.
- सेवेची वृत्ती – यशाची खरी किंमत इतरांना मदत केल्याने वाढते.
- मोठी स्वप्ने व समाजहित – जागेपणीची स्वप्ने समाजासाठी कार्य करण्यास प्रेरित करतात.
- मातृभाषेचा अभिमान – आत्मविश्वास आणि ओळख दृढ करणारी.
- सकारात्मक दृष्टीकोन – ऊर्जा, आनंद आणि आत्मविश्वासाचा स्रोत.
- मार्गदर्शन (मेंटॉरशिप) – प्रवास अधिक दिशादर्शक आणि यशस्वी करणारे.

## प्रमुख पाहुणे २०२४



**डॉ. एस. एस. मंथा** कुलगुरू - रामदेव बाबा युनिव्हर्सिटी, नागपूर

- शैक्षणीक अर्हतेवर आधारित करिअर आणि कौशल्य व क्षमतेवर आधारित करिअर अशा दोन पर्यायांवर एकाच वेळी समांतर काम करा.
- व्यावसायिक शिक्षण व नवीन तंत्रज्ञान हे स्थानिक रोजगार आणि आर्थिक उन्नतीसाठी संधी प्रदान करते
- व्यवसाय व्यवस्थापन, आर्थिक साक्षरता आणि नवसंकल्पना या गोष्टी आर्थिक संधी बद्दल विचार करण्यास सक्षम बनवितात.
- जिज्ञासू रहा, कठोर परिश्रम करा आणि यशस्वी होण्याच्या तुमच्या क्षमतेवर विश्वास ठेवा.



**श्री दीपक चौधरी** अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक - स्पेक्ट्रम इलेक्ट्रिकल इंडस्ट्रीज

- आपला आत्मविश्वास मजबूत ठेवा, तोच आपल्याला अडचणीतून मार्ग काढण्याची शक्ती देतो..
- आपण स्वतः आपले प्रेरणास्रोत असतो त्यामुळे आपल्यातील उर्जा व कौशल्य बाहेर न शोधता स्वतः मध्येच शोधा.
- अपयशी लोकांच्या स्टोरी वाचून आपल्या आयुष्यात ते होऊ नये म्हणून काय काळजी घेता येईल यातून आपल्याला यशाचा मार्ग मिळतो..
- शून्यातून विश्व निर्माण करता येते त्यासाठी परिस्थिती नुसार स्वतः मध्ये बदल करा.

## प्रमुख पाहुणे – २०२३



डॉ. श्री. आनंद कुमार संचालक – सुपर 30, पटना

- 'अपयशच'मोठी संधी देते त्यामुळे कुठल्याही परिक्षेला वयाच्या बंधनात अडकवू नका.
- शिक्षणाला आणि आयुष्याला क्षणिक सुखात मापू नका, दुरदृष्टीतून भविष्यात उजेड पेरण्याचा प्रयत्न करा.
- माहितीयुक्त ज्ञान स्वविकासातून निर्माण होते आणि तेच ज्ञान संधी निर्माण करते म्हणून विद्यार्थ्यांनी प्रयोगशिलतेला व
- पालकांनी बदल स्विकारला पाहिजे, मुलांना निर्णय घेवू द्या, त्यांना प्रेरणा द्या.

# प्रेरणादायी विचार (Cont'd)

## प्रमुख पाहुणे – 2022



डॉ. सौ. सुषमा पी विरमणी – संचालक – रामानुजन इंस्टिटयुट, चेन्नई

- एसडी–सीड करीत असलेले काम अभूतपूर्व आहे. अशा महान संस्थेचा लाभ इतर जिल्हयातील विद्यार्थ्यांनाही मिळावा अशी माझी इच्छा आहे.
- विद्यार्थ्यांनी कधीही आत्मविश्वास गमावू नये आणि सदैव आनंदी रहावे.
- नेहमी मानवी मुल्यांना महत्व द्यावे व एक चांगला माणूस व्हावे हे अत्यंत महत्वाचे आहे.

## प्रमुख पाहुणे – 2021



**श्री. विश्वासराव पाटील** – ज्येष्ठ गांधीवादी विचारवंत, शहादा

- विद्यार्थ्यांनी किंमतीच्या जगातून निघून मुल्यांच्या जगात यायचे आहे आणि तिथेच न थांबता उदात्त मुल्यांच्या जगात यायचे आहे.
- 'दातृत्व ही जगातील सर्वात मोठी शक्ती आहे.
- मी गरीब असेल, साधारण परिस्थिती असेल तरी खचून न जाता आत्मविश्वासाने त्याला सामोरे जा.
- शिक्षणामुळेच आपण मैत्री जोपासायला शिकतो आणि त्याच्या मुळेच आपल्याला मान–सन्मान मिळत असतो.
- जीवनमुल्यांचा आपण स्विकार केला पाहिजे कारण मुल्ये माणसाला जगणे शिकवितात.

## प्रमुख पाहुणे – 2018



**श्री. हणमंतराव गायकवाड,** संस्थापक – भारत विकास ग्रुप, मुंबई

- गुणवत्तेत कुठलीही तडजोड न करता निरीक्षण व सामान्य ज्ञान जाणून घ्या.
- 'जगात ब–याच प्रमाणात रोजगाराच्या संधी उपलब्ध असून असे काही करा ज्यातून समाजहित, देशहितासोबत तुमचे आयुष्य सुद्धा घडेल.
- दररोज काही नवीन शिकण्याचा प्रयत्न करा. जगाच्या पाठीवर कुठेही काम करण्याची तयारी ठेवा आणि आपल्या कामाशी प्रामाणिक राहा.
- आजच्या जगात नुसते उत्तम असणे पुरेसे नाही तर कायम सर्वोत्तमच असले पाहिजे.



**श्री. विजय दर्डा,** अध्यक्ष – लोकमत मिडीया प्रा. लि., नागपूर

- गरजू, हुशार व होतकरू विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती प्रदान करून शिक्षणासाठी प्रोत्साहित करण्यात येते.
- शिक्षण हे एकच असे माध्यम आहे, ज्याद्वारे सुसंस्कृत देश घडू शकतो तसेच संपूर्ण जग बदलू शकते. आणि माध्यमातून पुढे सुंदर भारतासाठी सुंदर विधाता घडू शकतो.
- आपल्या देशाची ओळख ही तिच्या संस्कृतीवरून होत असते. आपल्या संस्कृतीतील प्रत्येक गोष्टीला वैज्ञानिक महत्त्व प्राप्त झाले असून देशभरात सन्मान केला जातो. त्यामुळे ती टिकविण्यासाठी व देशाच्या विकासासाठी मुलांसह मुलींना देखील शिक्षण दिले पाहिजे.

# प्रेरणादायी विचार (Cont'd)

## प्रमुख पाहुणे – 2017



**श्री. अविनाश धर्माधिकारी**, माजी सनदी अधिकारी व संस्थापक – चाणक्य मंडळ परिवार पुणे

जीवन आणि करिअर घडविण्याचे त्रिसूत्र

- 'स्वओळख'–प्रत्येकजण बुद्धिमान आहे, पण प्रत्येकाने आपली बुद्धी कुठे चालते ते ओळखले पहिजे. दुस–याकडे पाहून कोणत्या क्षेत्रात जायचे, हे ठरवू नका.
- 'स्वनिर्णय' – स्वतःचे मन कशात रमते व स्वतःची क्षमता यावर क्षेत्र निवडा. जीवनाची दिशा त्यानुसार ठरवा व जागतिक स्पर्धेत तयार व्हा.
- 'समर्पित' – जागतिक पातळीवरील स्पर्धेचा विचार करून निवडलेल्या क्षेत्रात पूर्णपणे पारंगत, उत्तम व प्रतिभावंत व्हा. त्या क्षेत्रासाठी स्वतःला समर्पित करा, यशस्वी जीवनाची पायाभरणी या टप्प्यातच होते.

## प्रमुख पाहुणे – 2016



**डॉ. राजन वेळूकर,** माजी कुलगुरू, मुंबई विद्यापीठ

- विद्यार्थ्यांनी ही मदत एक संधी म्हणून पाहावी आणि त्याद्वारे विकास साधावा. मुख्य म्हणजे शिक्षण आणि विकास यांचा परस्पर संबधं आहे. कारण जितके जास्त शिक्षण तेवढा देशाचा विकास जास्त होतो.



प्रा. पी.पी. पाटील, कुलगुरू, उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ

- श्री. सुरेशदादा जैन यांनी हा उपक्रम जातीपातींपलीकडे राबवून शिक्षणासंबंधी मोठे काम हाती घेतले आहे.
- गुणवत्ता सिद्ध करण्यासाठी आर्थिक विवंचनेतील विद्यार्थ्यांना याद्वारे मदत मिळते व त्यांच्या अडचणी दूर होतात.



**प्रा. प्रकाश पाठक,** कार्यकारी संचालक, भोसला मिलीटरी स्कूल, नाशिक

- उद्याची जीवनाची सूत्रे समजून घेताना विद्यार्थ्यांनी जगातील ज्ञानाच्या मागे झपाटल्यासारखे लागावे.
- शिष्यवृत्ती हा निधी आहे, मात्र तो देण्यामागे ज्यांचा भाव असतो तो ओळखणे महत्त्वाचे आहे.

# प्रेरणादायी विचार (Cont'd)

## प्रमुख पाहुणे – 2015



**डॉ. पंडीत विद्यासागर**, कुलगुरू, मराठवाडा विद्यापीठ


- परिस्थितीशी जुळवून घेण्याची क्षमता विकसित करा. स्वयंशिस्त लावा त्यामुळे यश मिळेल.
- संधी सांगून येत नाही त्यामुळे मिळालेल्या संधीचा सदुपयोग करा.



**डॉ. गिरीश कुलकर्णी**, संस्थापक व अध्यक्ष, स्नेहालय, अहमदनगर

- वंचितांना मदत करणे म्हणजे माणुसकीचा धर्म पाळणे होय.
- सुरेशदादांचे हे विद्यार्थ्यांच्या आत्मीयतेपोटी सुरू असलेले कार्य अतिशय निःस्वार्थ आहे. अशा कार्याची आज देशाला आवश्यकता आहे.

## प्रमुख पाहुणे – 2014



**डॉ. आनंद कर्वे**, नामांकित वैज्ञानिक

- आजची जी शिक्षणपद्धती आहे, त्यात विद्यार्थ्यांची जी नवीन विचार करण्याची शक्ती आहे ती मारून टाकली जात आहे. यावर मात करून नव्या विचारांची व्याप्ती अंगीकारणे अत्यंत गरजेचे आहे.
- जगात जी नवकल्पना मांडली, ती भारताने मांडली आहे. त्यामुळे नवीन संशोधक वृत्ती जोपासा, नवनिर्मिती व नवविचारांचा मार्ग पत्करा.



**डॉ. सुनिलकुमार लवटे**, संशोधक व लेखक

- भारत पुढील काही वर्षात महासत्ता बनू शकतो, यासाठी तरुणांनी पुढे येवून योगदान देणे महत्त्वाचे आहे.
- समाजात विविध माध्यमातून मदत करणाऱ्या दातृत्वामुळे अनेक गरजूंना आधार मिळत असतो.
- महान व्यक्तींच्या सान्निध्यात राहा. मिळालेल्या शिष्यवृत्तीचा उपयोग उत्तम करा.

# प्रेरणादायी विचार (Cont'd)

## प्रमुख पाहुणे – 2008 ते 2013



**डॉ. शंकर पुणतांबेकर**, ज्येष्ठ साहित्यिक – **प्रमुख पाहुणे**, 2013

- शिंपल्यात पडणारा पाण्याचा थेंब मोती होतो आणि तोच थेंब सापाच्या तोंडात पडला तर त्याचे विष होते. याप्रमाणे दादांनी सुरू केलेल्या या योजनेतून शिष्यवृत्ती प्राप्त केलेल्या शेकडो विद्यार्थ्यांचे मोती होणार.



**डॉ. रघुनाथ माशेलकर**, प्रसिद्ध वैज्ञानिक – **प्रमुख पाहुणे**, 2011

- विद्यार्थ्यांनी यशाने हुरळून जावू नये.
- प्रयत्नांच्या पराकाष्ठेने यशाचे शिखर गाठल्यास जळगावातील व्यक्तीला नोबेल पारितोषिक मिळू शकते.




**डॉ. नरेंद्र जाधव**, सदस्य–नियोजन आयोग, भारत सरकार – **प्रमुख पाहुणे**, 2010

- तुमचे ध्येय निश्चित करा आणि ते नक्कीच साध्य कराल असा प्रचंड विश्वास तुमच्यामध्ये असायला हवा.
- परिश्रमाला पर्याय नाही. वेळेचे चांगल्या प्रकारे नियोजन करा.
- पालकांचा आदर करा. सामाजिक जबाबदारी लक्षात ठेवा व नेहमी सकारात्मक विचार करा.



**डॉ. एन.के. ठाकरे**, माजी कुलगुरू–उमवि – **प्रमुख पाहुणे**, 2009

- रडणाऱ्याला हसवणं, पडलेल्याला उठवणं, गरजवंताला मदत करणं हीच खरी ईश्वरसेवा आहे.
- गरीब, गुणवंत विद्यार्थ्यांसाठी शिष्यवृत्ती सुरु करून मा. सुरेशदादा खऱ्या अर्थाने ईश्वरसेवा करीत आहेत.



**श्री. एम.बी. शाह**, ज्येष्ठ साहित्यीक व गांधीवादी विचारवंत – **प्रमुख पाहुणे**, 2008

- त्याग आणि मूल्यांवर आधारित असलेले राहणीमान एक चांगला नागरिक बनविते.

# आमचे काही नेत्रदीपक यशस्वी लाभार्थी



**इशिता हेमंत पाटे**
बी. ई. कॉम्प्युटर्स - द्वितीय वर्ष
झोनल स्तरावर कॅरमचा विजेता



**यश नारायण पाटील**
बी. ई. इट – चौथे वर्ष
हॅकेथॉन We4Tech 24 मध्ये उपविजेता



**पीयूष चंद्रकांत बडगुजर**
बी. ई. आय. टी. – तृतीय वर्ष
इनोवेडा मध्ये प्रथम पारितोषिक जिंकले.



**सेजल सुनील महाजन**
एम.कॉम. द्वितीय वर्ष
पहिल्याच प्रयत्नात सीए फाउंडेशन उत्तीर्ण. सीए इंटरमिजिएट उत्तीर्ण.



**श्रद्धा विनोदकुमार जैन**
बी. कॉम तिसऱ्या वर्षी
जिल्हास्तरीय चेस्स स्पर्धेत चांदी पदक जिंकले.



**दुर्गेश अनिल पाटील**
बी.टेक. संगणक - चौथे वर्ष
कोडस्फेअरमध्ये उपविजेता, इन्फोयसी येथे इंटर्नशिपसाठी निवड.



**नयन जितेंद्र बोरसे**
एस. वाय. जे. सी. - विज्ञान
राज्यस्तरीय विज्ञान प्रदर्शनात 'इन्स्पायर पुरस्कार' प्रदान



**श्रुती उज्वल शुक्ला**
बी. कॉम. प्रथम वर्ष
तालुका स्तरावर बुद्धिबळात प्रथम क्रमांक, विभागीय स्तरावर डॉजबॉलमध्ये तिसरे क्र

# लाभार्थ्यांचे मनोगत



ऋतुजा अ सोनवणे
जळगाव
बी डी एस तिसरे वर्ष

माझे नाव रुतुजा अनिल सोनवणे असून मी जळगावची रहिवासी आणि एस.डी. सिडची शिष्यवृत्तीधारक आहे. सध्या मी बॅचलर ऑफ डेंटल सर्जरी च्या तिसऱ्या वर्षाला शिक्षण घेत आहे. मागील ४ वर्षांपासून मला एस.डी. सिडकडून शिष्यवृत्ती मिळत आहे, ज्यामुळे मला दरवर्षी आर्थिक मदत मिळाली आहे. माझे वडील लहानसा सलून चालवतात, आणि या शिष्यवृत्तीमुळे माझ्या शिक्षणाचा आर्थिक बोजा कमी होऊन माझ्या पालकांना मोठा दिलासा मिळाला आहे. फक्त आर्थिक मदतच नव्हे, तर एस.डी. सिडकडून विविध मार्गदर्शन व मेंटॉरशिप कार्यक्रमही आयोजित केले जातात. मला मीनाक्षी ताई मेंटॉर म्हणून लाभल्या, ज्यांनी माझ्याशी नियमित संवाद साधून माझ्या अडचणी समजून घेतल्या आणि मला योग्य वेळी योग्य मार्गदर्शन केले. माझी अपेक्षा आहे की एस.डी. सिड असेच माझ्यासह इतर पात्र विद्यार्थ्यांना मदत करत राहील. त्यांच्या सातत्यपूर्ण मदतीबद्दल आणि प्रोत्साहनाबद्दल मी संपूर्ण एस.डी. सिड टीमची मन:पूर्वक आभारी आहे. भविष्यात मीही या उपक्रमा अंतर्गत इतर विद्यार्थ्यांना मदत करण्याचा नक्की प्रयत्न करेन, याची खात्री देते



दुर्वणकर सोनार
जळगाव | बी टेक
कॉम्प. एससी. चौथा वर्ष

मी दुर्वणकर सोनार राहणार जळगाव. मी सध्या बी टेक कॉम्प्युटर सायन्सच्या शेवटच्या वर्षाला शिकत आहे. मला गेली दोन वर्षे एसडी सीड तर्फे शिष्यवृ त्ती मिळत आहे. त्यामुळे मी खूप आनंदी व आभारी आहे. या शिष्यवृत्तीमुळे मला कॉलेजची फी भरण्यास मदत झाली व त्यामुळे माझ्या आई-वडिलांचा आर्थिक भार कमी झाला. तसेच पुस्तके व इतर शैक्षणिक गरजांसाठी ही स्कॉलरशिप मला खूप मोठा आधार ठरली आहे. ही एक छान संधी आहे. कारण यामुळे आपल्याला केवळ आर्थिक मदत मिळत नाही तर अभ्यासात अजून चांगले काम करण्याची प्रेरणा मिळते. या उपक्रमासाठी मी दादांचे मनापासून आभार मानतो व त्यांनी ही दिलेली मदत आमच्यासाठी विश्वास व प्रोत्साहन आहे.



नकुल हेमंत ढाके
जळगाव
बीई कॉम्प्युटर्स प्रथम वर्ष

माझं नाव नुकुल ढाके असून मी जळगावचा रहिवासी आहे. मी गेल्या पाच वर्षांपासून एस.डी. शिष्यवृत्तीचा लाभार्थी आहे. या शिष्यवृत्तीमुळे मला उच्च शिक्षण घेण्यासाठी मोठा आधार मिळाला आहे. यामुळे माझ्या कुटुंबावरील आर्थिक ओझं कमी झालं आणि मला आत्मविश्वासाने अभ्यासावर लक्ष केंद्रित करता आलं. या उपक्रमामागील प्रेरणास्थान असलेल्या मा. श्री. सुरेशदादा जैन यांना मी मन:पूर्वक वंदन करतो. त्यांच्या सामाजिक आणि शैक्षणिक कार्यातील दृष्टीकोन व समर्पणामुळे आमच्यासारख्या विद्यार्थ्यांना ही अमूल्य संधीची व्यासपीठ प्राप्त झाली आहे. या शिष्यवृत्तीमुळे माझ्या भविष्यात मी अधिक आत्मविश्वासाने पाहू शकलो आहे. पुढील काळात संधी मिळाल्यास मी या संस्थेसोबत काम करून आर्थिकदृष्ट्या दुर्बल विद्यार्थ्यांना मदत करीन, त्यांच्या शिक्षणासाठी हातभार लावीन आणि त्यांच्या स्वप्नपूर्तीत सहभागी होईन. पुन्हा एकदा मी एस.डी.-सीड गव्हर्निंग बोर्ड व विशेषत: मा. श्री. सुरेशदादा जैन यांचे माझ्यावर विश्वास दाखवल्याबद्दल, प्रोत्साहन दिल्याबद्दल आणि मला जीवनात पुढे जाण्याची संधी दिल्याबद्दल मन:पूर्वक आभार मानतो.



मानसी बालु शिर्साट
जळगाव | बी.व्हीएस्सी.&
ए.एच. तिसरे वर्ष

मी मानसी शिर्साट, सध्या नागपूर व्हेटरनरी कॉलेज, नागपूर येथे बी.व्ही.एस्सी. अँड ए.एच. च्या तिसऱ्या वर्षाला शिक्षण घेत आहे. एस.डी. सीड शिष्यवृत्ती मिळाल्याबद्दल व एस.डी. सीड परिवाराचा एक भाग असल्याबद्दल मला अतिशय अभिमान व आनंद वाटतो. ही शिष्यवृत्ती माझ्या शिक्षणाला सहाय्यभूत ठरली असून मला माझ्या ध्येयाकडे अधिक प्रामाणिकपणे प्रयत्न करण्यासाठी प्रोत्साहन दिले आहे. या आर्थिक सहाय्यामुळे माझ्या पालकांवरील शुल्काचा आर्थिक भार कमी झाला आहे व त्यांना दिलासा मिळाला आहे. आपल्या मौल्यवान सहकार्याबद्दल मी मन:पूर्वक कृतज्ञता व्यक्त करते.

# निष्कर्ष

- चांगले शिक्षण व्यक्तीचे चारि़त्र्य घडविते.
- चांगले शिक्षण जीवन सुसंस्कारित व सुसंस्कृत करते.
- चांगल्या शिक्षणामुळे महत्त्वाकांक्षी संधी निर्माण होतात.
- चांगल्या शिक्षणामुळे एक चिरंतन समाज निर्माण होतो.
- चांगले शिक्षण मानवता टिकून राहण्यासाठी आवश्यक आहे.
- एसडी–सीड वंचित मुलांना चांगले शिक्षण देणे.
- एसडी–सीड सर्वांचे भविष्य उज्ज्वल व्हावे यासाठी बांधणी करीत आहे.

# धन्यवाद

YouTube



SEED

19 YEARS
EMPOWERING STUDENTS SINCE 2008
Suresh Dada Scheme for
Educational & Entrepreneurial Development
सुरेशदादा शैक्षणिक व उद्योजकता विकास योजना